तातडीचे व महत्वाचे

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हींसेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट, १९२३ द्वारा स्थापित व महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ द्वारा संचालित विद्यापीठ)

(सामान्य प्रशासन)

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रविन्द्रनाथ टागोर मार्ग, नागपूर – ४४० ००१.
दूरध्वनी क्रमांक: कार्यालय : ०७१२–२५२२९९१, फॅक्स : ०७१२–२५५५७०१

क्रमांक: रातुमनावि/साप्र/स/२४८३
दिनांक: २३ जानेवारी २०१७

प्रति,

विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या
सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य.

**विषय: कार्यालयामधील अंतर्गत महिला तक्रार निवारण समितीचे सक्षमीकरण करण्यासाठी कार्यशाळा तथा प्रशिक्षण कार्यक्रम घेण्याबाबत.**

**संदर्भ:** १. श्रीमती विजया रहाटकर, अध्यक्षा, महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई यांचे दिनांक ५ जानेवारी २०१७ रोजीचे पत्र.

२. विद्यापीठाचे पत्र क्रमांक रातुमनावि/साप्र/स/२४७७, दिनांक १३ जानेवारी २०१७.

३. डॉ. मंजुषा मोळवणे, उपसचिव, महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई यांचे दिनांक २० जानेवारी २०१७ रोजीचे पत्र.

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषयांकीत संदर्भिय पत्र क्रमांक २ अन्वये, 'कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ संरक्षण (प्रतिबंध मनाई आणि निवारण) अधिनियम, २०१३' या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी तसेच कायद्याबद्दल जागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने आपल्या महाविद्यालयात कार्यशाळा आयोजित करून त्याबाबतचा अहवाल दिनांक १ मार्च २०१७ पर्यंत किंवा तत्पूर्वी महाराष्ट्र राज्य महिला आयोग, गृहनिर्माण भवन (म्हाडा बिल्डिंग), कलानगर, पोटमाळा, वांद्रे (पूर्व), मुंबई–४०००५१ या कार्यालयाकडे पाठविण्याचे, तसेच अहवालाची प्रत विद्यापीठाच्या संचालक, महिला अध्ययन केन्द्र, लक्ष्मीनारायण तांत्रिक परिसर, अमरावती रोड, नागपूर यांचेकडे देखील पाठविण्याचे आपणास कळविण्यात आले आहे.

यासंदर्भात डॉ. मंजुषा मोळवणे, उपसचिव, महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई यांनी संदर्भिय पत्र क्रमांक ३ अन्वये, नागपूर जिल्ह्यासाठी महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या विविध कार्यक्रमांचे समन्वयक म्हणून श्री. अनिल रेवतकर हे नेहमी काम पाहत असल्याचे व त्यांचा भ्रमणध्वनी क्रमांक ९२२६७२९९९८ हा असल्याचे आणि याबाबत आपल्या महाविद्यालयात उपरोक्त आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यशाळेचे समन्वयक म्हणून काम पाहणाऱ्या व्यक्तीस याबाबत अवगत करण्याचे कळविले आहे. तसेच त्यांनी महाविद्यालयात कार्यशाळेच्या आयोजन/नियोजनात काही अडचणी उद्भवल्यास आयोग कार्यालयाच्या ०२२–२६५९१३२२, डॉ. मंजुषा मोळवणे (९९६७४३९१९१) आणि श्रीमती सकिना शरीफ (९००४३५८५०१) या दुरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधण्याचे कळविले आहे.

करिता आपणास कळविण्यात येते की, उपरोक्त बाबत आपल्या महाविद्यालयाद्वारे आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यशाळेच्या आयोजन/नियोजनात काही अडचणी उद्भवल्यास कृपया वरील क्रमांकीत दुरध्वनी/भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा, ही विनंती.

आपला

(पुरणचंद्र मेश्राम)
कुलसचिव

**प्रतिलिपी माहितीस्तव:**

श्रीमती विजया रहाटकर, अध्यक्षा, महाराष्ट्र राज्य महिला आयोग, गृहनिर्माण भवन (म्हाडा बिल्डिंग), कलानगर, पोटमाळा, वांद्रे (पूर्व) मुंबई– ४०००५१.